# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 09-02-2024

नागपूर(महाराष्ट्र) मध्ये नागपूर ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2024-02-09 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

| हवामान घटक | 2024-02-10 | 2024-02-11 | 2024-02-12 | 2024-02-13 | 2024-02-14 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 6.6 | 35.1 | 7.9 | 4.8 |
| कमाल तापमान (अं.से) | 29.0 | 29.2 | 29.1 | 29.3 | 29.7 |
| किमान तापमान (अं.से) | 14.4 | 14.6 | 14.2 | 14.7 | 15.1 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 46 | 55 | 62 | 63 | 59 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 36 | 38 | 42 | 43 | 39 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 6 | 6 | 5 | 5 | 5 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 51 | 65 | 122 | 101 | 112 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 2 | 3 | 3 | 4 | 5 |

### हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक१० ते १४ फेब्रुवारी २०२४ दरम्यान आकाशआंशिक ते आंशिक ढगाळ राहण्याची अधिकशक्यता, • दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता, • दिनांक ११, १२, १३ व १४ फेब्रुवारी २०२४ रोजी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता, • दिनांक ११, १२ व १३ फेब्रुवारी २०२३ रोजी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • विदर्भामध्ये पुढील ५ दिवसामध्ये कमाल तापमानामध्ये फारसा बदल होणार नाही. • विदर्भामध्ये पुढील ४८ तासामध्ये किमान तापमानात फारसा बदल होणार नाही त्यानंतर २ ते ३ अंश सेल्सिअस ने किमान तापमानात वाढ होईल.

### कृषि सल्ला:

• पाऊस व मेघगर्जनेसह विजांचा अंदाज लक्षात घेता, परिपक्व अवस्थेतील हरभरा, तूर, जवस, मोहरी तसेच इत्यादी रब्बी हंगामातील पिकांची काढणी व मळणी पुढील २४ तासामध्ये प्राधान्याने उरकून घ्यावी. काढणी/कापणी केलेल्या शेतमालाची कोरड्या व सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. मळणी ची कामे शक्य नसल्यासशेतमाल पावसाच्या संपर्कात येणार नाही याची काळजी घ्यावी तसेच कापणी केलेला शेतमाल ताडपत्री किंवा प्लास्टिक शीटच्या सहाय्याने झाकून ठेवावा. • पावसाचा अंदाज लक्षात घेताहंगामी पिके, फळबागा, भाजीपाला पिकामध्ये आंतरमशागतीची कामे (डवरणी, खुरपणी इत्यादी.) तसेचकीड व रोग व्यवस्थापनासाठी कृषी रसायनांची फवारणीची कामे पुढील २४ तासामध्ये उरकून घ्यावे तसेच त्यानंतर पावसाचा अंदाज लक्षात घेता पुढील ३ दिवस पुढे ढकलावी. • पावसाचा अंदाज लक्षात घेता, कृषी उत्पन्न बाजार समिती मधील खरेदीदार व इतर शेतमाल खरेदीदारांनी शेतकऱ्यांद्वारा विक्रीसाठी आणलेला शेतमाल उघड्या जागेवर व न ठेवता शेड मध्येच साठवावा. • बाजारायोग्य फळे व भाजीपाला याची काढणी करून विक्री करावी. • पावसाचा अंदाज लक्षात घेता उशिरा पेरणी केलेल्या गहू, हरभरा,जवस, मोहरी इत्यादी तसेच भाजीपाला व फळबागांना पुढील ३ ते ४ दिवस ओलीत करणे टाळावे. • विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रॅक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. • पाऊस व मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता, शेतकरी व शेतमजूर यांनी सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. शेतातील कामे शक्यतो सकाळच्या वेळी उरकून घेण्याला प्राधान्य द्यावे. शेतमजुरांना शेतामध्ये एकत्रित समूहाने काम करू न देता दोन व्यक्तीमध्ये जास्तीत जास्त अंतर ठेवावे. शेतात आसरा घेताना पाण्याचे स्त्रोत (विहीर, तलाव, नदी इत्यादी), उंच ठिकाणे (झाडे, उंचवटे), धातूचे अवजारे या पासून जास्तीत जास्त अंतरावर आसरा घ्यावा. उंच ठिकाणांवर वीज आकर्षित होत असल्याने कोणत्याही परिस्थितीमध्ये झाडाखाली आसरा घेणे टाळावे.

### संक्षिप्त संदेश सल्ला:

• पावसाचा अंदाज लक्षात घेता उशिरा पेरणी केलेल्या गहू, हरभरा, जवस, मोहरी इत्यादी तसेच भाजीपाला व फळबागांना पुढील ३ते ४ दिवस ओलीत करणे टाळावे.

### पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
| --- | --- |
| तूर | • पाऊस व मेघगर्जनेसह विजांचा अंदाज लक्षात घेता, परिपक्व अवस्थेतील तूरपिकाची काढणी व मळणी पुढील २४ तासामध्ये प्राधान्याने उरकून घ्यावी. काढणी/कापणी केलेल्या शेतमालाची कोरड्या व सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.मळणी ची कामे शक्य नसल्यास शेतमाल पावसाच्या संपर्कात येणार नाही याची काळजी घ्यावी तसेच कापणी केलेला शेतमाल ताडपत्री किंवा प्लास्टिक शीटच्या सहाय्याने झाकून ठेवावा. |
| हरभरा | • पाऊस व मेघगर्जनेसह विजांचा अंदाज लक्षात घेता, परिपक्व अवस्थेतील हरभरा पिकाची काढणी व मळणी पुढील २४ तासामध्ये प्राधान्याने उरकून घ्यावी. काढणी/कापणी केलेल्या शेतमालाची कोरड्या व सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.मळणी ची कामे शक्य नसल्यास शेतमाल पावसाच्या संपर्कात येणार नाही याची काळजी घ्यावी तसेच कापणी केलेला शेतमाल ताडपत्री किंवा प्लास्टिक शीटच्या सहाय्याने झाकून ठेवावा. |
| गहू | • पावसाचा अंदाज लक्षात घेता उशिरा पेरणी केलेल्या गहू पिकास पुढील ३ ४ दिवस ओलीत करणे पुढे ढकलावे. • पाऊस व मेघगर्जनेसह विजांचा अंदाज लक्षात घेता, परिपक्व अवस्थेतील गहू पिकांची काढणी व मळणी पुढील २४ तासामध्ये प्राधान्याने उरकून घ्यावी. काढणी/कापणी केलेल्या शेतमालाची कोरड्या व सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. मळणी ची कामे शक्य नसल्यास शेतमाल पावसाच्या संपर्कात येणार नाही याची काळजी घ्यावी तसेच कापणी केलेला शेतमाल ताडपत्री किंवा प्लास्टिक शीटच्या सहाय्याने झाकून ठेवावा. |
| करंडई | • करडई पिकामध्ये ढगाळ वातावरणामुळे मावा किडीचा प्रादुर्भाव (आर्थिक नुकसान पातळी- ३० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे) दिसून आल्यास डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १३ मि. ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मोसबी | • फळे गळणे आणि फळांचा दर्जा खराब होऊ नये यासाठी बाजारायोग्य तयार फळांची काढणी करावी. • फळ बागेमध्ये पाणी दिल्याबरोबर ताण तुटतो व नवीन पालवी किंवा नवतीची सुरुवात होते. या वेळी सिट्रस सिला व त्याची पिल्ले पानातील रस शोषून घेतात. नवतीच्या पानाची गळ होऊन फांद्या सुकतात व फळधारने वर अनिष्ठ परिणाम होतो. ह्या किडीद्वारे “ग्रीनींग” या रोगाचा प्रादुर्भाव होतो. या किडीच्या व्यवस्थापनासाठी डायमेथोएट ३० ईसी २ मिली किंवा एसिफेट ७५ % एसपी २ ग्राम किंवा इमिडाक्लोप्रीड १७.८ एसएल ०.५ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून नवीन नवतीवर फवारणी करावी. दुसरी फवारणी १० दिवसानंतर कीटकनाशकाची आलटून पालटून फवारणी करावी. • आंबिया बहाराच्या वेळी जिबरेलिक आम्ल १.५ ग्राम सोबत १ किलो युरिया १०० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी. • संत्रा झाडाच्या खुंटामधून डिंकाचा स्त्राव दिसून आल्यास असा डिंक तीक्ष्ण चाकूने खरडून टाकावा व ती जागा पोटॅशियम परमॅग्नेट १० ग्राम १ लिटर पाणी या प्रमाणात केलेल्या द्रावणाने धुवावे व त्या ठिकाणी मेफेनोक्सम एमझेड ६८ (मेटालिक्सील एम ४ % + मॅन्कोझेब ६४ % डब्ल्यूपी) किंवा फोसेटील- एएल या अमलाची पेस्ट लावावी. |

**फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:**

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
| --- | --- |
| अळशी | • पाऊस व मेघगर्जनेसह विजांचा अंदाज लक्षात घेता, परिपक्व अवस्थेतील जवस पिकांची काढणी व मळणी पुढील २४ तासामध्ये प्राधान्याने उरकून घ्यावी. काढणी/कापणी केलेल्या शेतमालाची कोरड्या व सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.मळणी ची कामे शक्य नसल्यास शेतमाल पावसाच्या संपर्कात येणार नाही याची काळजी घ्यावी तसेच कापणी केलेला शेतमाल ताडपत्री किंवा प्लास्टिक शीटच्या सहाय्याने झाकून ठेवावा. |
| आंबा | • आंब्याच्या झाडावर तुडतुडे किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास व्यवस्थापनासाठी बुप्रोफेझीन २५ % SC १० मिली किंवा डेल्टामेथ्रीन २.८ % EC ५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ % प्रवाही ४ मिली किंवा लँबडा सायहॅलोथ्रिन ५ % प्रवाही ५ मिली किंवा डायमेथोएट ३० % प्रवाही १६.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून हे द्रावण खोडावर, फांद्यावर, शेंड्यावर आणि मोहोरावर फवारावे. • आंब्याच्या झाडावर फुलोरा अवस्थेत भुरी रोगाची लक्षणे दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी पाण्यात मिसळणारे गंधक ८० % डब्ल्यूपी 30 ग्राम किंवा टेट्राकोनाझोल ३.८ % प्रवाही १२.५ मिली किंवा हेक्झाकोनाझोल ५ % प्रवाही १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मिरची | • फळे गळणे आणि फळांचा दर्जा खराब होऊ नये यासाठी बाजारायोग्य तयार फळांची काढणी करावी. • मिरची पिकावरील पानावरील ठिपके रोगास थंड, दमट स्थिती आणि मध्यम तापमान रोगास अनुकूल आहे. मिरचीच्या पिकावर पानावर ठिपके रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास कॉपर ऑक्सीक्लोराईड ५० % डब्ल्यूपी @ १००० ग्रॅम प्रति एकर ३०० ते ४०० लिटर पाणी किंवा मॅन्कोझेब ७५ % डब्ल्यूपी @ ६००-८०० ग्रॅम प्रति एकर ३०० लिटर पाणी किंवा हेक्साकोनाझोल ७५ % डब्ल्यूजी @ २७ ग्रॅम प्रति एकर प्रति २०० लिटर पाणी किंवा क्रेसॉक्सिम-मिथाइल १५ % + क्लोरोथॅलोनिल ५६ % डब्ल्यूजी @ ४०० ग्रॅम प्रति एकर प्रति २०० लिटर पाणी किंवा कार्बेन्डाझिम १२ % + मॅन्कोझेब ६३ % डब्ल्यूपी @ ३०० ग्रॅम प्रति एकर प्रति २०० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान असताना फवारणी करावी. |
| टोमॅटो | • संभाव्य पावसामुळे फळे गळणे आणि फळांचा दर्जा खराब होऊ नये यासाठी बाजारायोग्य तयार फळांची काढणी करावी. • मागील आठवड्यातील ढगाळ हवामानामुळे टोमॅटो पिकावर उशिरा येणाऱ्या करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी स्वच्छ हवामन परिस्थिती असताना कॉपर ऑक्सिक्लोराईड (३.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मॅन्कोझेब (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा बोर्डो मिश्रण (१ %) किंवा कॉपर हायड्रॉक्साईड (२.० ग्रॅम/लि.) किंवा फोसेटील एएल ( ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा डायमिथोमोर्फ (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा पुर्वमिश्रित बुरशीनाशक पायराक्लोस्ट्रोबिन + मेटीराम (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मेफेनोक्झाम + कॉपर ऑक्सिक्लोराईड (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मेटालीक्सील ८ % + मॅन्कोझेब ६४ % (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) या प्रमाणातफवारणी करावी. |

**पशुधन विषयक निहाय सल्ला:**

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रॅक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. • जनावरांना पायखुरी – तोंडखुरी रोगाविरुद्ध लस टोचावी. |

**इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:**

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • शेतकरीबांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: जर तुम्हीशेतात काम करीत असाल तर शेताजवळील ताबडतोब आश्रय घ्यावा. शेतातील सुरक्षितठिकाणाचा आसरा घेतल्यानंतर पायाखाली कोरडे लाकूड, प्लास्टिक, गोणपाट, कोरडापालापाचोळा ठेवावा. तुमचे दोन्ही पाय एकत्र करून गुडघ्यावर दोन्ही हात ठेवूनतळपायावर बसावे. तुमच्या पायाव्यतिरिक्त शरीराचा अन्य कुठलाही भाग जमिनीलास्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. जमिनिमध्ये ओलावा असलेल्या ठिकाणीकिंवा पाण्याच्या स्त्रोतामध्ये जसे कि, तलावात काम करणाऱ्या व्यक्तींनी ताबडतोब सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी जावे.जवळपास उंच झाडे असतील तर त्या झाडाच्या उंचीपेक्षा दुप्पट उंचीच्या अंतरावरआश्रय घ्यावा. • विजांच्याबचावापासून पक्के घर हे सर्वात सुरक्षित ठिकाण आहे. शेतकऱ्यांनी आपले घर तसेचजनावरांचा गोठ्याच्या आजूबाजूला शक्यतो कमी उंचीची झाडे लावावीत. ओलावा असलेले, दलदलीचे ठिकाण तथा पाण्याचे स्तोत्र (विहीर, तलाव, नदी, शेत तालाव ई.) पासूनशक्यतो दूर राहावे. चारचाकी वाहनातून प्रवास करीत असल्यास वाहनातच थांबावे.शेतकरी बांधवांनी त्यांच्याजवळ धातूचे कुठलेही उपकरण नसावे याची दक्षता घ्यावी.शेतामध्ये काम करतांना एकाच वेळी जास्त व्यक्तींनी एकत्र काम करू नये. दोनव्यक्तीमध्ये किमान १५-२० फूट अंतर राहील याची काळजी घ्यावी. धातूची दांडीअसलेल्या छत्रीचा वापर करू नका. शेतकऱ्यांनी विजेवर चालणारी तसेच धातू पासूनबनलेल्या इतर कृषी अवजारांपासून दूर रहा. |
| सामान्य सल्ला | • हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. * संशोधनावर आधारित शिफारस. दोन किंवा त्यापेक्षा अधिक रसायने किंवा संजीवके एकत्र मिसळू नये. |
| सामान्य सल्ला | • शिफारशीनुसार या महिन्यात भेंडी, गवार, चवळी, काकडी, दुधी भोपळा, कासेफळ, दोडका, कारली, ढेमसे, टरबूज, खरबूज, पालक, मुळा, मेथी आणि कोथिंबीर याची लागवड करावी. ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धतीने ओलीत व्यवस्थापन करावे. |